# शिकाऊ उमेदवार वीजतंत्री व तारमार्गतंत्री जाहिरात

म.रा.वि.वि. कंपनी मर्या. मालेगाव मंडल कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील **मालेगाव, मनमाड, सटाणा व कळवण** विभागाकरिता नाशिक जिल्हयातील शिकाऊ प्रशिक्षणार्थी वीजतंत्री (Apprentice Electrician) पदाकरिता ६८ व प्रशिक्षणार्थी तारमार्गतंत्री (Apprentice Lineman) पदाकरिता ५७ असे एकुण १२५ पदे भरण्याकरिता **दि.१८.०३.२०२०** रोजी पात्र उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाईल.

**अटी व शर्ती –**

(१) वयोमर्यादा – जाहिरातीच्या तारखेस वय १८ वर्षे पुर्ण असावे व जास्तीत जास्त वय २१ वर्षे (अ.जा. व अ.ज. करिता ५ वर्ष शिथिलक्षम) (२) सदर उमेदवार हा नाशिक जिल्हयातीलच रहिवासी असावा. (३) **शैक्षणिक पात्रता –** उमेदवार हा १० वी उत्तीर्ण असावा व महाराष्ट्र शासनमान्यता प्राप्त आय.टी.आय. वीजतंत्री/तारमार्गतंत्री (फेब्रुवारी २०१७ नंतर) उत्तीर्ण असावा. **आय.टी.आय. गुणांची अट** खुल्या प्रवर्गाकरिता किमान ६०% व मागास प्रवर्गातील (अ.जा. व अ.ज.) उमेदवारांकरिता किमान ५५% गुण आवश्यक. (४) उमेदवाराची कागदपत्र पडताळणीपुर्वी **www.apprenticeship.gov.in** या वेबसाईटवर नोंदणी झालेली असणे आवश्यक आहे. (५) प्रशिक्षण कालावधी – नियुक्ती दिनांकापासुन एक वर्ष राहील. (६) प्रशिक्षण कालावधीत शिकाऊ उमेदवारांना नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करणेत येईल. (७) उमेदवाराने सोबत येतांना आपली सर्व मुळ शैक्षणिक कागदपत्रे **(शाळा सोडल्याचा दाखला, १०वी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र/गुणपत्र, I.T.I. च्या चारही सत्रांची गुणपत्रिका )** व अधिवास प्रमाणपत्र तसेच त्यांच्या साक्षांकीत छायाप्रती सोबत आणाव्यात. (८) प्रशिक्षण संपल्यानंतर शिकाऊ उमेदवारांना कंपनीच्या सेवेत सामावुन घेणे बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. (९) जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही. (१०) शिकाऊ उमेदवार निवड प्रक्रीयेदरम्यान उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल. (११) नाशिक जिल्हयातील पात्र व इच्छुक उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह खाली दिलेल्या पत्त्यावर उपस्थित रहावे.

**कागदपत्रे जमा करण्याचे ठिकाण :– अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.कंपनी मर्या., मालेगाव मंडल कार्यालय, १३२ के.व्ही. सोयगाव उपकेंद्र मालेगाव, ता. मालेगाव, जि.नाशिक –४२३२०३.**

**दिनांक –१८/०३/२०२०. वेळः सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० पर्यंत.**

**अधिक्षक अभियंता,**
**म.रा.वि.वि.कं. मर्या. मालेगाव मंडल.**

**पीआरओ नं. ०७२/२०२०**